# प्रेस नोट

अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : २५/०४/२०१९

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती घटक |
| २ | आरोपीचे नाव, हुददा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | अमोल भगवंतराव ढोले, वय ३१ वर्षे, पद : Finance Management Group (FMG) लेखापाल, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, अमरावती अंतर्गत राष्ट्रीय आरोग्य अभियान जिल्हा कार्यालय, जिल्हा सामान्य रुग्णालय परिसर, अमरावती |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | दिनांक २५.०४.२०१९ चे १३.२३ वा. ते १३.३७ वा.दरम्यान |
| ४ | मागणी केलेली रक्कम | ७,०००/— रुपये |
| ५ | स्विकारलेली रक्कम | ७,०००/— रुपये |
| ६ | घटनास्थळ | राष्ट्रीय आरोग्य अभियान जिल्हा कार्यालय, अमरावती, जिल्हा सामान्य रुग्णालय परिसर, अमरावती |

**थोडक्यात हकिकत** : यातील तक्रारदार व्यवस्थापक असलेले देविकर अॅक्वा, अमरावती कडून राष्ट्रीय आरोग्य अभियान जिल्हा कार्यालय, अमरावती येथे सन २०१६—१७ पासुन पुरविण्यात आलेल्या पाणी कॅनचे बिल काढून दिल्याबद्दल त्यांनी पुरविलेल्या पाणी कॅनचे प्रती कॅन ५/— रुपये प्रमाणे श्री.अमोल ढोले लाचेची मागणी करीत असल्याबाबत प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने दिनांक २४.०४.२०१९ रोजीचे पडताळणी कार्यवाही दरम्यान आरोपी श्री.अमोल ढोले यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांनी पुरविलेल्या १४००/— कॅनचे बिल काढून दिल्याबददल प्रती कॅन ५/— रुपये प्रमाणे एकुण ७,०००/— रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आज दिनांक २५/०४/२०१९ रोजी आयोजित सापळा कार्यवाही दरम्यान श्री.अमोल ढोले, लेखापाल यांना मागणी केल्याप्रमाणे तक्रारदार यांचेकडून ७०००/— रुपये लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. नमुद आरोपीविरुध्द पो.स्टे.सिटी कोतवाली, अमरावती शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही श्री. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती श्री.पंजाबराव डोंगरदिवे, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली आम्ही पोलीस उपअधीक्षक गजानन पडघन, पो.हवा.चंद्रशेखर दहेकर, पो.ना.सुनिल व—हाडे, पो.कॉ.अभय वाघ, पो.कॉ.महेंद्र साखरे, पो.ना.चंद्रकांत जनबंधु यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

**संपर्क** : अॅन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती
ऑफीस फोन नं.०७२१—२५५२३५५, २५५३०५५
टोल फ्रि नंबर —१०६४

कार्यालय पोलीस उप-अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक ब्युरो अमरावती

(गजानन पडघन)
पोलीस उपअधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
मो.नं.९९२३७३८१००

Scanned by CamScanner